स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे

# सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविद्यालय संगमनेर.

## अर्थशास्त्र विभाग वार्षिक अहवाल २०२२-२०२३

अर्थशास्त्र विभाग आणि पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन या वर्षात करण्यात आले. दि. 30 नोव्हेंबर 2022 रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर डॉ. भगवान अहिरे साई करियर प्रशिक्षण संस्था संगमनेर.यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दिनांक 14 नोव्हेंबर 2022 रोजी "विद्यार्थी उद्योजकांच्या भेटीला" या उपक्रमांतर्गत श्री स्वामी समर्थ औद्योगिक केंद्राला सर्व विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी भेट दिली. तेथील प्रमुख व्यवस्थापक श्री. रमेश सिनारे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या लघु उद्योगा विषयी सविस्तर माहिती दिली.

दिनांक 13 जानेवारी 2023 रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवसीय "संशोधन पद्धती कार्यशाळेचे" आयोजन करण्यात आले. त्यात पहिले सत्र डॉ. सुरेखा भिंगारदिवे कोपरगाव कॉलेज यांचे व्याख्यान झाले. आते दुसरे सत्र अर्थशास्त्र विभागाचे प्रोफेसर डॉ. सुहास आव्हाड यांनी घेतले.

तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रोफेसर डॉ. सुहास आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली 12 संशोधन प्रकल्प पूर्ण केले. आणि एम ए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. शोभा राहणे यांच्या मार्गदर्शनाखाली 21 संशोधन प्रकल्प पूर्ण केले. हे संशोधन प्रकल्प शेती, रोजगार, बँकिंग, उद्योग, स्थानिक समस्या, झोपडपट्टी समस्या, दारिद्य निर्मूलन अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प केले.

तसेच, अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम वर्षभर आयोजित केले जातात. त्यामध्ये गटचर्चा, सेमिनार, उद्योजक आपल्या भेटीला, संशोधन पद्धती कार्यशाळा, पीपीटी सादरीकरण, रांगोळी स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या बारा विद्यार्थ्यांनी पीएचडी संपादन केली आहे. तर एका विद्यार्थ्याने एम. फील. पदवी प्राप्त केली आहे. अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी सदर शैक्षणिक वर्षामध्ये प्रत्येकी दोन असे एकूण आठ संशोधन पेपर प्रकाशित केले आहे.

Co-ordinator & Head,
Post Graduate Research Center in Economics
S. M. B. S. T. College, Sangamner

S. M. B. S. T. COLLEGE SANGAMNER

**Principal**
**S.M.B.S.T. College Sangamner**